# येलोझोनचे जीपीएस लोकेशन फोटो दाखल करून ग्रीनझोन प्लेग्राऊंडच्या आरक्षित जागेचे नाहरकत प्रमाणपत्र घेतल्याची शंका

**सर्वे नं.५४ तरफ गिराममधील त्या १६ गुंठे जागेची सामाईक रजिस्ट्री संशयास्पद**

**ज्यादिवशी अर्जदाराने झोनप्रमाणपत्र मिळविण्यासाठी बीड नगरपालिकेत अर्ज केला त्याचदिवशी सहाय्यक नगररचनाकार यांनी दिले झोनप्रमाणपत्र,उच्चस्तरीय चौकशीची गरज**

**नाहरकत प्रमाणपत्र घेण्यासाठी नगरपालिकेत दाखल केलेली संचिकेची प्रत दिव्य आधार काढून पाठपुरावा करणार**

**बीड । दिव्य रिपोर्टर**

चालू वर्षात बीड दुय्यम निबंधक क्र.१ मधून सर्वे नंबर ५४ तरफ गिराममधील १६ गुंठे जमिनीची सामाईक रजिस्ट्री करण्यात आली. सदरील रजिस्ट्री करण्यासाठी संबंधितांनी नगरपालिकेतून नाहरकत प्रमाणपत्र काढून सदरील जमिनीचे खरेदीखत केले. नगरप्रशासनाच्या सहाय्यक नगररचनाकार यांनी अर्जदाराने ज्यादिवशी झोनप्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज केला होता त्याचदिवशी झोनप्रमाणपत्र दिल्याने हा सर्व प्रकार संशयास्पद वाटत असून सहाय्यक नगररचनाकार यांनी दिलेल्या झोनप्रमाणपत्रात उल्लेख केला की, जीपीएस फोटो लोकेशनच्या आधारावर सदरील नाहरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे. एकंदरीत हा सर्व प्रकार संशयास्पद वाटत असल्याने दिव्य आधारने हा प्रश्न उपस्थित केला असून नगरपालिका मुख्याधिकारी यांनी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करणे गरजेचे आहे.

बीड शहरच्या नकाशात सर्वे नं.५४ तरफ गिराम यातील काही भाग प्लेग्राऊंडसाठी आरक्षित असल्याने ग्रीनझोनमध्ये दिसतो. तर काही भाग आरक्षित नसल्याने येलोझोनमध्ये दिसून येतो. काही दिवसांपूर्वी चालू वर्षी सर्वे नं.५४ मधील १६ गुंठे जमिनीची सामाईक रजिस्ट्री बीड निबंधक कार्यालयातून करण्यात आली. ही रजिस्ट्री करण्यासाठी नगरपालिकेने नाहरकत प्रमाणपत्र दिल्याने त्या प्रमाणपत्राच्या आधारावर सदरील १६ गुंठे जमिनीची रजिस्ट्री करण्यात आल्याचे दिसून येते. संबंधित अर्जदाराने येलोझोनचे जीपीएस लोकेशन फोटो नगरपालिकेत दाखल करून ग्रीनझोन प्लेग्राऊंडच्या आरक्षित असलेल्या जागेचे नाहरकत प्रमाणपत्र घेतल्याची शंका असून चौकशीअंती सर्व बाबींचा खुलासा होईल. यासाठी पारदर्शक चौकशी करणे गरजेचे आहे. जर नियमाने रजिस्ट्री झालेली १६ गुंठे जागा ही येलोझोनमध्ये असेल तर काहीही हरकत नाही.

### दिव्य आधार पाठपुरावा करणार

सर्वे नं.५४ तरफ गिराम यातील काही जागा येलोझोन तर काही जागा आरक्षित असल्याने ग्रीनझोनमध्ये आहे. संबंधित अर्जदार जागेच्या मालकाने नगरपालिकेत १९ नोव्हेंबर २०२५ रोजी नाहरकत प्रमाणपत्र मिळविण्यासाठी नगरपालिकेत अर्ज दाखल केले होते. नगरपालिकेतील सहाय्यक नगररचनाकार यांनी त्याच दिवशी म्हणजे १९ नोव्हेंबर रोजीच नाहरकत प्रमाणपत्र दिल्याने हा सर्व प्रकार संशयास्पद वाटत असून जर एखाद्या जागा मालकाने नाहरकत प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्यानंतर किमान ती जागा आरक्षित आहे की नाही, त्या जागेची खरी वस्तूस्थिती काय आहे? याची शहानिशा करणे ही नगरपरिषदेची जबाबदारी आहे परंतु जीपीएस लोकेशन फोटोच्या आधारावर तात्काळ म्हणजे ज्यादिवशी अर्ज केला त्याचदिवशी नाहरकत प्रमाणपत्र देणे हे योग्य वाटत नसून या सर्व प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करणे गरजेचे आहे. तसेच ज्या संचिकेच्या आधारावर नगरप्रशासनाने नाहरकत प्रमाणपत्र दिले ती संचिका नगरपालिकेतून काढून दिव्य आधार पाठपुरावा करणार हे मात्र खरे आहे

# वक्फ बोर्डाची ट्रिब्युनलमध्ये धाव

## काळजी करू नका,साथ द्या,शंभर टक्के नोंदणी होईलच

**महाराष्ट्रातील प्रत्येक वक्फ संस्था उम्मीद पोर्टलवर नोंदणी केल्या शिवाय स्वस्थ बसणार नाही – अध्यक्ष समीर काझी यांचा विश्वास**

**बीड । दिव्य रिपोर्टर**

महाराष्ट्रातील सर्व वक्फ अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या मस्जिद, दरगाह, कब्रस्तान संस्था यांची 'उम्मीद पोर्टल' वर नोंदणी करण्याची अंतिम मुदत आज ५ डिसेंबर २०२५ पर्यंत आहे.आतापर्यंत महाराष्ट्रातील बहुतांश वक्फ संस्थांची नोंदणी पोर्टलवर झालेली आहे. मात्र अजूनही काही संस्था नोंदणी करण्याचे राहिलेल्या आहेत. त्यामुळे सबंधित संस्थांचे मुतवल्ली, ट्रस्टी आणि मुस्लिम समाजाने काळजी करू नये. घाबरून जावू नये.अफवांवर विश्वास ठेवू नये. वक्फ बोर्ड प्रत्येक संस्थांची नोंदणी करूनच घेणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने तारीख वाढवून देण्यास नकार दिला असला तरी वक्फ ट्रिब्युनल ( वक्फ न्यायाधिकरण )मध्ये जाण्याची मुभा दिलेली आहे. महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाने ट्रिब्युनल कोर्टात धाव घेतली असून तिथे नक्कीच



न्याय मिळेल आणि उम्मीद पोर्टलवर नोंदणीसाठी मुदतवाढ मिळेल असा विश्वास महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांनी व्यक्त केला आहे. राज्यातील प्रत्येक वक्फ संस्थांची नोंदणी झाल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही असेही अध्यक्ष काझी यांनी सांगितले.

....भारतात वक्फ संस्थांच्या नोंदणीत महाराष्ट्र राज्य दुसऱ्या क्रमांकावर आहे. उम्मीद पोर्टलवर वक्फ संस्थांची नोंदणी करण्यासाठी ५ डिसेंबर २०२५पर्यंत मुदत देण्यात आली होती. या कालावधीत बीडसह महाराष्ट्रातील बहुतांश ▶▶ पान २ वर...

### वक्फ न्यायाधिकरणाची केंद्र सरकारला नोटीस,दहा डिसेंम्बर पर्यंत जबाब दाखल करा'

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आज तातळीने महाराष्ट्र वक्फ बोर्डाने वक्फ न्यायाधिकरण कडे धाव घेतली.न्यायधिकारणाने या वर तातळीने सूनवाई घेत केंद्र सरकारला नोटीस बजावत दहा डिसेंम्बर पर्यंत जबाब दाखल करण्याचे निर्देश दिले नोटिशीत वेळ का वाढवून देऊ नये,म्हणून दहा डिसेंम्बर पर्यंत जबाब दाखल करा,असा निर्देश दिल.न्यायधिकारणाच्या नोटीस मुळे वेळ वाढवून मिळण्याची शक्यता असून या मुळे मोठा दिलासा ही मिळाला आहे.

### संभ्रम बाळगू नका,वेळ वाढवून मिळाली नाही

आज दिवस भर टीव्ही व सोशियाल मीडियावर केंद्रीय अपल्पसंख्यांक मंत्री किरण रिजिजू यांचे एक वक्तव्य समोर आले.त्यात त्यांनी मुतवल्लींना सरसकट दिलासा माळेला नाही मात्र न्यायाधिकरण कडून वेळ वाढवून मिळण्याची अपेक्षा आहे. जे न्यायधिकारणात जाणार त्यांना पेनल्टी लावली जाणार नाही म्हणून सांगितले.तसेच पोर्टलवर अपलोड करण्यास वेळ वाढवून न देता ज्या संस्था अपलोड केल्या गेल्या,त्यांचा चेकर व अप्रोवल साठी पुढील तीन महिन्याचा कालावधी ठरवून देण्यात आला. असे असले तरी काही जणांनी सोशियाल मेडिया वर वेळ वाढवून दिल्याच्या बातम्या पसरविला म्हणून संभ्रम न बाळगता वेळेत संस्था अपलोड करण्याचे बंधनकारक असल्याचे वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांनी खुलासा केला.


https://epaper.divyaaadhar.com

सत्यमेव जयते

साप्ताहिक

# दिव्य आधार



rizwanshaikhekmat33@gmail.com

संपादक : शेख रिजवान मो. 9561840184





ग्राऊंड रिपोर्टींग

पान ४ वर



बीड वर्ष १३ वे, अंक १४, सोमवार, दि. ०८ डिसेंबर २०२५ RNI/MAHMAR/2013/54433 पाने–४ किंमत १ रुपया


# त्या शिक्षणसंस्था चालकांकडून शिक्षणविभागाची दिशाभूल, बालेपीर रोशनपुरा येथील उर्दू भागशाळा १९७४ साली अस्तित्वातच नव्हती

**बालेपीर परिसरातील चाऊस गल्लीत तुकडी चालविण्यासाठी होती परवानगी, त्याठिकाणी संबंधित शिक्षणसंस्थेने सुरू केली पहिली ते पाचवीपर्यंत अनाधिकृत भागशाळा**

**तर मग चाऊस गल्लीतील ती शाळा रोशनपुरा येथे गेली कशी? प्राथमिक शाळेची माध्यमिक शाळा झाली कशी? शिक्षण विभागातील काही अधिकारी शिक्षणसंस्था चालकांसोबत मॅनेज असल्याचा संशय**

**२०१० या वर्षापर्यंत रोशनपुऱ्यातील त्या शाळेची इमारतच नव्हती, संबंधित शिक्षणसंस्थेच्या नावावर ती जागाही नव्हती तर मग १९७४ साली दिलेल्या पत्राच्या आधारावरती रोशनपुरा येथील उर्दू शाळा सुरू करणे कितपत योग्य**

**बीड । दिव्य रिपोर्टर**

पूर्वी शाळांची कमतरता असल्याने इतर परिसरातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी दूरच्या शाळेत ये–जा करावे लागत होते. वाहातुकीचाही प्रश्न होता म्हणून तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी काही उर्दू शिक्षणसंस्था चालकांना इतर परिसरात आपल्या शाळेच्या तुकड्या सुरू करून विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासंदर्भात पत्रव्यवहार केला होता. त्या पत्राचा दुरुपयोग करत काही शिक्षणसंस्था चालकांनी तुकड्याच्या नावावर चक्क भागशाळा सुरू करून त्या शाळा प्राथमिक, माध्यमिक करून शिक्षकभरती करण्याचा डाव केला. विशेष म्हणजे शिक्षणसंस्था चालकांकडून शिक्षणविभागाची मोठी दिशाभुल करण्याचा हा प्रयत्न असून बालेपीर, रोशनपुरा येथील उर्दू भागशाळा १९७४ साली अस्तित्वातच नव्हती तर मग ती शाळा आज कोणत्या आधारावर सुरू आहे. किमान गटशिक्षणाधिकारी यांनी याचा आढावा तरी घ्यावा, जेणेकरून जिल्हा परिषदच्या शाळांना कुलूप लागणार नाही.

शहरातील बालेपीर, भालदारपुरा व गांधीनगर परिसरात काही उर्दू शिक्षणसंस्था चालकांच्या भागशाळा सुरू आहेत. या भागशाळा कोणत्या आधारावर सुरू आहेत याची शिक्षणविभागाने विचारणा केल्यानंतर त्या शिक्षणसंस्था चालक संबंधित शिक्षणविभागाला १९७४ साली तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी तुकड्या चालविण्यासंदर्भात दिलेल्या परवानगीचे पत्र दाखून शिक्षणविभागाची दिशाभूल करत असल्याचे दिसून येत असून २०१० साली शिक्षणाधिकारी यांनी या भागशाळांची तपासणी करून सदरील भागशाळा अनाधिकृत असल्याचा अहवाल दिलेला असतानाही त्या अनाधिकृत भागशाळा २०१० या सालानंतरही आजपर्यंत सुरूच आहेत. नियमाने या अनाधिकृत भागशाळांवर दंडात्मक कारवाई करण्याची गरज असतानाही (पान २ वर)

### ती शाळा चाऊस गल्लीतील तर मग रोशनपुरा येथे शाळा कोठूण आली?

त्या उर्दू शिक्षणसंस्थेची पूर्वी चाऊस गल्लीत एक शाळा होती. ती शाळा भागशाळेच्या नावावर सुरू होती. त्याठिकाणी पहिली ते पाचवीपर्यंत विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जात असावे, त्यानंतर पुढील शिक्षणासाठी त्या शाळेतील विद्यार्थ्यांना संबंधित शिक्षणसंस्थेच्या मुख्य शाळेत पाठविले जात होते. अशाप्रकारे तुकडीच्या नावावर ही भागशाळा अनाधिकृतपणे सुरू होती. त्यानंतर चाऊस गल्लीतील ती शाळा बंद झाली तर मग ती शाळा गेली कुठे? बालेपीर, रोशनपुरा परिसरात ती शाळा आली कोठूण? याची उच्चस्तरीय चौकशी करावी अशी मागणी सर्वसामान्यातून होत आहे.

### प्राथमिक शिक्षणाधिकारी यात काय मार्गदर्शन करणार याकडे लक्ष

शहरातील बालेपीर (रोशनपुरा), भालदारपुरा व गांधीनगर परिसरात काही उर्दू शिक्षणसंस्था चालकांच्या भागशाळा अनाधिकृतपणे सुरू आहेत. यासंदर्भात दिव्य आधारने पाठपुरावा केल्यानंतर गटशिक्षणाधिकारी यांनी संबंधित शिक्षणसंस्था चालकांना सदरील शाळा कोणत्या आधारावर सुरू आहेत याचे कागदपत्रे दाखल करावी असे सांगितल्यानंतर संबंधित अनाधिकृत भागशाळेच्या मुख्याध्यापकांनी काही कागदपत्रे गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे सादर केली. यात १९७४ साली तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी त्या काळाच्या गरजेनुसार तुकडी चालविण्यासंदर्भात परवानगी दिल्याचे दिसून येते. विशेष म्हणजे बालेपीर (रोशनपुरा) या भागात २०१० पर्यंत त्या शिक्षणसंस्थेची कोणतीच शाळा नव्हती तर मग १९७४ चे पत्र या शाळेला लागू होणार का? हा महत्त्वाचा प्रश्न असून गटशिक्षणाधिकारी यांनी प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना या प्रकरणी मार्गदर्शन मागितले आहे. आता प्राथमिक शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील या काय मार्गदर्शन करतील याकडे विशेष लक्ष राहणार आहे.

# सहजिल्हा निबंधक अशोक आटोळे यांनी केज दुय्यम निबंधक कार्यालयातून मागविला अहवाल

**बनावट व्यक्ती उभा करून जमिनीची रजिस्ट्री केल्याप्रकरणी होणार उच्चस्तरीय चौकशी**

**तब्बल पंधरा दिवस झाले तरी केज दुय्यम निबंधक कार्यालयाने अहवाल सादर केला नाही, अधिकाऱ्याच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह**

**बीड । दिव्य रिपोर्टर**

बारामती येथील एका व्यक्तीची जमीन केजमध्ये होती. तो व्यक्ती केजला येत नसल्याने याचा फायदा घेत काही भूमाफियांनी त्या व्यक्तीची जमीन बनावट व्यक्ती उभा करून रजिस्ट्री करून दिली. ज्यावेळी बारामती येथील त्या व्यक्तीला आपली जमीन बनावट व्यक्ती उभा करून विक्री केल्याची माहिती मिळाल्यानंतर संबंधित व्यक्तीने महसूलमंत्री यांच्यासह जिल्हानिबंधक बीड यांना तक्रार दिल्यानंतर याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी सुरू झाली असून सहजिल्हा निबंधक अशोक आटोळे यांनी याप्रकरणी केज सहदुय्यम निबंधक कार्यालयाला पत्रव्यवहार करून या प्रकरणाचा अहवाल मागितला आहे.

बनावट व्यक्ती उभा करून जमिनीची रजिस्ट्री केल्याप्रकरणी तक्रार दाखल झाल्यानंतर केज दुय्यम निबंधक कार्यालयात एकच खळबळ उडाली. ज्या व्यक्तीची जमीन आहे तो व्यक्ती बारामतीत राहतो. केजला येणे होत नाही याचाच फायदा घेत काही भूमाफियांनी सदरील जमीन बनावट व्यक्ती उभा करून रजिस्ट्री करून विक्री केली. सदरील बाब बारामती येथील ओरिजनल मालकाला समजल्यानंतर त्यांनी याप्रकरणी महसूलमंत्री यांच्यासह सह जिल्हानिबंधक ▶▶ पान २ वर...

### तत्कालीन सहदुय्यम निबंधक अधिकारी अडचणीत येण्याची शक्यता

बारामती येथील व्यक्ती ज्यादिवशी केज दुय्यम निबंधक कार्यालयात रजिस्ट्री झाली त्यादिवशी तो व्यक्ती कुठे होता याचे सीसीटीव्ही फुटेज संबंधित मालकाकडे आहे. तसेच जमिनीची रजिस्ट्री करण्यासाठी भूमिअभिलेख कार्यालयातून जमीन मोजणी करून घेतलेल्या नकाशासाठी अर्जही त्यांनी केला नव्हता. तर मग भूमिअभिलेख कार्यालयातून मोजणी करून नकाशे कोणी मागणी केली? त्याशिवाय तो बनावट व्यक्ती कोण? याचा शोध घेणे गरजेचे असून या बनावट रजिस्ट्री प्रकरणी तत्कालीन सहदुय्यम निबंधक अधिकारी अडचणीत येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# जीएसटी भरलेले बनावट बिले टिंबर मर्चंटमधून घेवून लाकूड व्यापाऱ्यांना देणारे दलाल सक्रीय

**टॅक्स विभागाने अशा एजंटांचा शोध घेवून त्यांच्यावर कारवाई करण्याची गरज**

**सोमवारी मनसेचे राज्यउपाध्यक्ष अशोक तावरे हे काही संशयीत टिंबर मर्चंटसहीत एजंटाची टॅक्स विभागाला तक्रार करणार असल्याची मिळाली माहिती**

**बीड । दिव्य रिपोर्टर**

शेवरीच्या लाकडापासून कागद तयार होतो म्हणून शेवरीचे वृक्ष तोडण्यास बंदी नाही, शेवरीचे लाकूड तोडून गुजरातच्या एका कंपनीत सदरील लाकूड पाठविले जाते. सर्व काही नियमाने होत असले तरी ज्या कंपनीत हे लाकूड जाते त्या कंपनीचा काही एजंट लाकूड व्यापाऱ्यांच्या माध्यमातून गेम करत असल्याची शंका असून जीएसटी भरलेले बनावट बिले बीडच्या काही टिंबर मर्चंटमधून घेवून ती बनावट बिले कंपनीला लाकूड पुरवठा करणाऱ्या व्यापाऱ्यांना देवून कंपनीचा गेम करत असल्याचे दिसून येत असून टॅक्स विभागाने बनावट बिले विक्री करणाऱ्या एजंटाचा शोध घेणे गरजेचे आहे. तसेच या प्रकरणी मनसेचे राज्यउपाध्यक्ष अशोक तावरे हे लवकरच काही संशयीत टिंबर मर्चंट व एजंटाच्या नावासहीत तक्रार करणार असल्याचे त्यांनी दिव्य आधारला सांगितले.

बीड शहरातील काही टिंबर मर्चंट चालक लाकूड व्यापाऱ्यांना जीएसटी भरलेली बिले टक्केवारी घेवून देतात. व्यापारी ती बिले घेवून संबंधित गुजरातच्या कंपनीला त्या बिलाच्या आधारावर शेवरीचे लाकूड विक्री करतात. कंपनीला लाकूड दिल्यानंतर त्या कंपनीकडून जीएसटीसहीत बिले वसूल करतात अशाप्रकारे हा धंदा मागील अनेक वर्षापासून सुरू असून नेकनूर येथील एका एजंटाचा यात समावेश असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे त्या एजंटाचा कोणताच लाकडाचा धंदा ▶▶ पान २ वर...

### नेकनूरचा तो एजंट कोण?

मनसेचे राज्य उपाध्यक्ष अशोक तावरे यांच्याकडे नेकनूरच्या त्या एजंटाची सर्व माहिती आली असून मागील अनेक दिवसांपासून बीडच्या टिंबर मर्चंटमधून जीएसटी भरलेली बिले घेवून तो नेकनूरचा एजंट इतर व्यापाऱ्यांना टक्केवारी घेवून बनावट बिले देत असल्याची माहिती मिळाली आहे. त्याअनुषंगाने अशोक तावरे लवकरच या प्रकरणी तक्रार करणार असून यात बीडचे काही टिंबरमर्चंट मालक व एजंटाचे साटेलोटे दिसून येत आहेत.

# काझी मोईद अहेमद यांचे निधन

**बीड । दिव्य रिपोर्टर**

औरंगाबाद साकीन बारी कॉलनी, रोशन गेट येथील अलमीर सेकंडरी स्कूलचे सेवानिवृत्त शिक्षक काझी मोईद अहेमद यांचे गुरुवार, दि.४ डिसेंबर रोजी आकस्मिक निधन झाले. दि.५ डिसेंबर शुक्रवारी सायंकाळी उस्मानाबाद येथे त्यांच्यावर दफनविधी करण्यात आला असून त्यांच्या पश्चात पत्नी, मुले,नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधन वार्तने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.



मुळचे उस्मानाबाद येथील काझी मोईद अहेमद हे औरंगाबाद येथील अलमीर सेकंडरी स्कूलमध्ये शिक्षक म्हणून कर्तव्यावर होते. मागील काही वर्षांपूर्वीच ते सेवानिवृत्त झाले होते. परंतु ४ डिसेंबर रोजी सायंकाळी त्यांना हृदयविकाराचा त्रास झाल्याने त्यांना उपचारार्थ रुग्णालयात घेवून गेल्यानंतर तेथील डॉक्टरांनी त्यांना मयत घोषीत केले. त्यांच्या या आकस्मिक मृत्यूने कुटुंबीयांनी व मित्रपरिवारांनी हळहळ व्यक्त केली. अहेमद कुटुंबीयांच्या दुःखात दिव्य आधार परिवार सहभागी आहे.

# कारागृहाकडे जाणाऱ्या सिमेंट रस्त्याचे साहित्य तपासणी रिपोर्ट देण्यास शाखाअभियंता यांच्याकडून टाळाटाळ

**भेगा भरून बिले उचलण्याचा गुत्तेदाराचा डाव दिव्य आधारने हाणून पाडला**

**साहित्य तपासणी न करता रस्ता तयार केल्यानेच अवघ्या दोन महिन्यात त्या रस्त्याचे दोन तुकडे झाले असल्याची शंका**

**ज्या शाखा अभियंतांच्या निगराणीत हे काम झाले त्या शाखा अभियंतांवर कारवाई करण्याची गरज**

**बीड । दिव्य रिपोर्टर**

नगर रोड ते कारागृहाकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम अवघ्या दोन महिन्यांपूर्वीच झाले होते. त्याठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाने सिमेंट रस्ता तयार केला होता परंतु दोन महिन्यांतच त्या सिमेंट रस्त्याचे दोन तुकडे झाले. या प्रकरणी दिव्य आधारने पाठपुरावा करून सदरील काम ज्या शाखा अभियंताच्या कार्यकाळात झाले त्या शाखा अभियंतावर कारवाई करण्याची मागणी केली होती. तसेच सदरील काम करण्यासाठी जे साहित्य वापरले त्या साहित्याची प्रयोगशाळेतून तपासणी केलेला अहवाल मागूनही शाखा अभियंता देण्यास टाळाटाळ करत असल्याचे दिसून येत असून सदरील कामाप्रकरणी अधिकाऱ्याच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

दोन तुकडे झालेल्या रस्त्याचे भेगा भरून गुत्तेदाराने बिल उचलण्याचा प्रयत्न केला होता परंतु दिव्य आधारच्या प्रतिनिधीने त्या भेगा पुन्हा उघड्या पडल्या याचे वृत्त प्रकाशित केल्यानंतर गुत्तेदाराने बिल उचलण्याचा केलेला प्रयत्न दिव्य आधारने हाणून पाडला. तसेच सदरील काम करण्यासाठी जे साहित्य वापरण्यात आले त्या साहित्याची प्रयोगशाळेतून तपासणी करून घेणे बंधनकारक आहे. त्या प्रयोगशाळेचा अहवाल मागील तीन आठवड्यापासून शाखा अभियंता यांच्याकडे मागणी करूनही मिळत नसल्याने शाखा अभियंता यांच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह लागले असून ज्या शाखा अभियंताच्या निगराणीत असे बोगस काम झाले त्या शाखा अभियंतावर नियमाने कारवाई करणे अपेक्षित आहे परंतु संबंधित उपअभियंता अशा बेजबाबदार शाखा अभियंतांना पाठिशी का घालत आहे हे मात्र समजून येत नाही. या सर्व प्रकरणाची कार्यकारी अभियंता यांनी उच्चस्तरीय चौकशी करणे गरजेचे वाटते.

### त्याठिकाणी शाखा अभियंता कोण याची उपअभियंतांनाच माहिती नाही

कारागृहाकडे जाणाऱ्या सिमेंट रस्त्याचे काम कोणत्या शाखा अभियंतांच्या कार्यकाळात झाले याची उपअभियंता यांनाच खात्रीलायक माहिती नाही, ही अत्यंत गंभीर बाब असून सुरुवातीला ज्यावेळी या रस्त्याचे काम सुरू झाले त्यावेळी खोदकाम सुरू असताना एक अभियंता होते. त्यानंतर उपअभियंता यांनी त्या अभयंतांचा पदभार काढून त्याठिकाणी दुसरे शाखाअभियंता नियुक्त केले. दुसऱ्या शाखा अभियंताच्या कार्यकाळात काँक्रेटचे काम झाले, एकंदरीत त्याठिकाणी शाखा अभियंता कोण? हा महत्त्वाचा प्रश्न असून ज्या अभियंताच्या कार्यकाळात काँक्रेटचे काम झाले तेच अभियंता खऱ्या अर्थाने या बोगसकामाला जबाबदार आहेत याची उपअभियंता यांनी खात्री करणे गरजेचे वाटते.

पान १ वरून

## त्या शिक्षणसंस्था चालकांकडून

गटशिक्षणाधिकारी या भागशाळांना पाठिशी घालत असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. या प्रकरणी शिक्षणसंचालक यांनी स्वत: लक्ष घालणे गरजेचे असून बालेपीर, रोशनपुरा परिसरातील शाळा १९७४ तर सोडाच २०१० पर्यंत त्याठिकाणी नव्हती. एवढेच नव्हे तर त्या शाळेची जागाही शिक्षणसंस्थेच्या नावावर रजिस्ट्री झाली नव्हती. २०१० नंतर बालेपीर, रोशनपुरा येथील शाळेची जागा संबंधित शिक्षणसंस्थेने खरेदी करून त्याठिकाणी इमारत बांधली व त्या ठिकाणी शाळा सुरू केली. ज्याअर्थी २०१० पर्यंत त्याठिकाणी शाळा नव्हती तर मग १९७४ साली दिलेले पत्र त्या शाळेला कसे लागू होणार? याचाही शिक्षणविभागाने विचार करण्याची गरज असून शिक्षणविभागातील काही अधिकारी शिक्षणसंस्था चालकांसोबत मोठा आर्थिक व्यवहार करून या अनाधिकृत भागशाळांना पाठिशी घालत असल्याची शंका व्यक्त केली जात आहे.

## जीएसटी भरलेले बनावट

नाही, तो फक्त बीडमधून काही टिंबर मर्चंट चालकांकडून जीएसटी भरलेली बनावट बिले घेतो आणि ती बनावट बिले लाकूड व्यापाऱ्यांना टक्केवारी घेवून विकतो. अशाप्रकारे त्या एजंटाचे काम सुरू असून त्या एजंटाने अशा बनावट बिलातून लाखो रुपयांची जीएसटी बुडविली असल्याची शंका व्यक्त केली जात आहे. जर टॅक्स विभागाने अशा बनावट बिले विक्री करणाऱ्या एजंटाला ताब्यात घेतले तर मोठी पोलखोल होण्याची शक्यता दर्शवली जात आहे.

## वक्फ बोर्डाची

वक्फ संस्थांनी नोंदणी केली असली तरी रेकॉर्ड उपलब्ध नसणे किंवा इतर कागदपत्रा अभावी अनेकांना नोंदणी करता आली नाही. सर्व कागदपत्र एकाच वेळी उपलब्ध करण्यासाठी अडचणी येत आहेत. त्याचबरोबर उम्मीद पोर्टल वरील तांत्रिक अडचणी देखील त्यासाठी कारणीभूत ठरू लागले आहेत. उम्मीद पोर्टल वरील नोंदणीसाठी मुदतवाढ मिळावी अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. न्यायालयाने सदरील याचिका फेटाळली मात्र वक्फ ट्रिब्युनल ( वक्फ न्यायाधिकरण) मध्ये जाण्यास मुभा दिली आहे. त्यामुळे आता महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाने वक्फ न्यायाधीकरणमध्ये धाव घेतली आहे. ट्रिब्युनलमध्ये नक्कीच न्याय मिळेल असा विश्वास राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांनी व्यक्त केला आहे.

**महाराष्ट्र दुसऱ्या स्थानी, ८० टक्के संस्थांची नोंदणी पूर्ण**

वक्स बोर्डाशी संबंधित सर्व संस्थांची नोंदणी उम्मीद पोर्टलवर करण्याचे काम गतीने झाले आहे. उम्मीद पोर्टलवरील नोंदणीत महाराष्ट्र राज्य देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्र राज्यात वक्फच्या३६ हजार रजिस्ट्रर्ड संस्थांची अनेक प्रॉपर्टीज आहेत. त्यापैकी ३० हजार संस्थांची प्रॉपर्टी उम्मीद पोर्टलवर नोंदविण्यात आली आहेत.महाराष्ट्रात संस्था नोंदणीचे तब्बल ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. वक्फ बोर्डाचे सर्व अधिकारी, कर्मचारी यांच्यामार्फत अतिरिक्त टेबल वाढवून नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. एवढेच नव्हे तर छत्रपती संभाजी नगर येथील हज हाऊसमध्ये ३०० युवा तंत्रज्ञ बसवून उम्मीद पोर्टलवरील नोंदणी गतीने कशी होईल यासाठी वक्फ बोर्डाने प्रयत्न केले.दरम्यान नोंदणीची मुदत होत असली तरीही राज्यातील प्रत्येक वक्फ संस्था नोंदणी केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. सर्वांना न्याय मिळेल असे महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांच्यासह वक्फ बोर्डाचे सर्व सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले.

## सहजिल्हा निबंधक अशोक

बीड यांच्याकडे तक्रार केल्यानंतर जिल्हानिबंधक अशोक आटोळे यांनी याप्रकरणी केज दुय्यम निबंधक कार्यालयातून अहवाल मागितला असून तब्बल पंधरा दिवस झाले तरी केज दुय्यम निबंधक कार्यालयाने अहवाल सादर केलेला नाही. याप्रकरणी येथील अधिकाऱ्यांच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून याप्रकरणी केज दुय्यम निबंधक कार्यालयाने तात्काळ अहवाल सादर करण्याची मागणी होत आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते कारंजा रस्ता अतिक्रमण मुक्त करा

## मुख्याधिकारी फडसे यांच्या तत्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना

**बीड | दिव्य रिपोर्टर**

शहरातील अत्यंत रहदारीचा आणि गजबजलेला रस्ता म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते कारंजा या रस्त्याच्या दुतर्फा रस्त्यावरच अतिक्रमणे करून व्यवसाय थाटण्यात आले असून या मुळे नेहमीच वाहतुकीची कोंडी असल्याने ही अतिक्रमणे तत्काळ काढण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते प्रमोद पुसरेकर यांनी मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्या कडे केली आहे.



बीड शहरातील अत्यंत रहदारीचा आणि गजबजलेला रस्ता म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते कारंजा या रस्त्याच्या दुतर्फा रस्त्यावरच अतिक्रमणे करून व्यवसाय थाटण्यात आले राजुरीवेस भागात असणारे मुख्य डाक घर (पोस्ट ऑफिस) हे नेहमीच विविध कामासाठी नागरिकांनी गजबजलेले असते. शहरातील हजारो नागरिक रोज या कार्यालयात कामानिमित्त येत जात असतात. मात्र या कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना आपली दुचाकी, सायकल आणि तुरळक प्रमाणात चारचाकी वाहने लावण्यास जागाच नसल्याने नागरिकांची अडचण मोठ्या प्राणावर होत आहे. या रस्त्यावर नगर परिषद कार्यालय आहे, जिल्हा मध्यवर्ती बँक आहे, छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण आहे, जिल्हा परिषद कार्यालय आहे, बांधकाम कार्यालय आहे, भाजी मंडई कडे जाण्याचा हाच रस्ता आहे, अनेक मोठे व्यासायिक प्रतिष्ठाने आहेत. त्यामुळे हा रस्ता नेहमीच गर्दीने भरलेला असल्याने वाहतुकीची कोंडी कायम ठरलेली. पण या कडे प्रशासनाकडून सोईस्करपणे दुर्लक्ष केले जात आहे. महत्वाचे म्हणजे पोस्ट ऑफिस बाहेर रस्त्यावर दुतर्फा करण्यात आलेली नालीवर अतिक्रमण धारक हातगाडे विक्रेते यांचे स्वतः ची खाजगी मालमत्ता असल्या प्रमाणे कब्जा करून बसले आहेत.अर्धा रस्ता काबीज करण्यात आला आहे. तसेच या ठिकाणी कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना हे अतिक्रमण धारक हातगाड्यासमोर दुचाकी लावण्यास अलिखित मनाई हुकूम करण्यात आला आहे. जर कोणी दुचाकी, सायकल लावण्याचा प्रयत्न केला तर आधी शिव्या, नंतर धमकी आणि वेळ प्रसंगी अंगावर धावून येण्याचे प्रकार काही वेगळे नाहीत. त्यातच भर म्हणून शहर वाहतूक पोलीस दंडात्मक कारवाई करण्यास कसलीच कसर सोडत नाहीत. रोज या ठिकाणी गाडी पार्किंग केल्या मुळे नागरिकांना आर्थिक झळ पोहचत आहे.त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक, शारीरिक, मानसिक पिळवणूक होत आहे. ही पिळवणूक .मुख्याधिकारी,नगर परिषद,बीड. यानी ही अतिक्रमणे तत्काळ काढून नागरिकांना दिलासा देऊन त्यांची आर्थिक, शारीरिक, मानसिक पिळवणूक थांबवावी ही विनंती चाणक्य सामाजिक प्रतिष्ठान चे अध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते प्रमोद पुसरेकर यांनी केली आहे. लवकरात लवकर ही अतिक्रमण न काढल्यास लोकशाही मार्गाने उपोषण करून आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी असा इशारा देण्यात आला आहे

# डॉ.बाबासाहेबांमुळे बहुजनांची मुलं सभागृहात गेली - अँड. सर्जेराव तांदळे

**बीड | दिव्य रिपोर्टर**

डॉ. बाबासाहेबांनी देशाच्या हितासाठी आपले आयुष्य वेचले, सामाजिक समता ,न्याय आणि मानवी हक्काच्या जपनुकीसाठी लढा उभारला , जगात सर्वोत्तम असणारी राज्यघटना देशाला समर्पित केली . त्यांच्या अतुलनीय योगदानामुळेच देश आज महासत्तेकडे वाटचाल करत आहे.

डॉ . बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या राज्य घटनेमुळे संघराज्य पद्धती अस्तित्वात येऊन देशातील बहुजनांची मुलं सभागृहात गेली व राज्य करती बनली असे विचार भारतीय जनता पार्टीचे नेते अँड. सर्जेराव तांदळे यांनी व्यक्त केले.



भारतीय जनता पार्टीच्या जिल्हा कार्यालयावर आयोजित करण्यात आलेल्या महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमासाठी भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष अशोक लोढा, भाजपा नेते देविदास नागरगोजे, जिल्हा सरचिटणीस गणेश लांडे, शांतिनाथ डोरले, इर्शादभाई शेख, सुनील मिसाळ , बबलू मिसाळ , केशव बडे , अशोक घोलप , सुंदर चव्हाण इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमात पुढे बोलताना त्यांनी असे विचार मांडले की आज देशामध्ये खऱ्या अर्थाने सामाजिक समता प्रस्थापित झाली असून उच्च-नीचता, स्पृश्य - अस्पृश्यता दूर झाली आहे. महाराष्ट्रात उपेक्षित वंचित असणाऱ्या बहुजन समाजाची मुलं आज विविध सभागृहामध्ये गेली असून त्यांच्याद्वारे समाजाचा व देशाचा विकास होत आहे. अभिवादनाच्या या कार्यक्रमासाठी प्रा. देविदास नागरगोजे , गणेश लांडे पाटील, अशोक लोढा, शांतिनाथ डोरले, चंद्रकांत फड ,इर्शाद भाई, सुंदर चव्हाण, सुनील मिसाळ, संतोष मिसाळ, धनंजय वाघमारे, अमर सानप, घोलप मामा, केशव बडे, यांच्यासह मोठ्या संख्येने भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिर्डीतील राज्य शालेय क्रिकेट निवड स्पर्धेत बीडचा शौर्य जाधव

**बीड | दिव्य रिपोर्टर**

महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्या वतीने आयोजित राज्य शालेय क्रिकेट (-१७) मुलें निवड स्पर्धा सन २०२४-२५ चे शिर्डी येथे यशस्वी आयोजन करण्यात आले.



राज्यातील जवळपास सर्व जिल्ह्यांतील शाळांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या स्पर्धेमध्ये राज्यभरातील हजारो प्रतिभावान खेळाडूंच्या दमदार कामगिरीतून ७० ते ८० उत्कृष्ट खेळाडू यांची पुढील निवड चाचणीसाठी निवड करण्यात आली. कठोर निवड प्रक्रियेनंतर महाराष्ट्र राज्य शालेय क्रिकेट संघासाठी केवळ १६ मुलांची अंतिम निवड करण्यात आली.या १६ राज्यस्तरीय निवडीतील मुलांत बीड जिल्ह्याचा शौर्य शैलेश जाधव याने आपली विजयी मजल मारत राज्य संघात स्थान पटकावले आहे. आपल्या उत्कृष्ट तंत्र, सातत्यपूर्ण सराव आणि प्रभावी खेळाच्या जोरावर शौर्यने राज्य निवड समितीचे लक्ष वेधून घेत सर्वोत्कृष्टांमध्ये स्थान मिळवले.शौर्यच्या या कामगिरीमुळे बीड जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असून त्याचे प्रशिक्षक, पालक, शाळा, तसेच जिल्ह्यातील क्रीडाप्रेमयांनी अभिनंदन केले आहे.

# बीडसांगवी परिसरात वाघ-बिबट्याचा धुमाकूळ

**सलग दोन दिवसांत तीन जनावरे ठार, शेतकरी चिंताग्रस्त**




**पाटोदा | दिव्य रिपोर्टर**

बीडसांगवी परिसरात सलग दोन दिवसांमध्ये वाघ अथवा बिबट्याच्या हल्ल्यात तीन जनावरे ठार झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनांमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून शेतकरी समुदायामध्ये प्रचंड चिंतेचे वातावरण आहे.

स्थानिक शेतकरी संपत ढोबळे यांनी सांगितले की, आधीच अतिवृष्टी, पिकांचे नुकसान आणि मालाला न मिळणारा भाव यामुळे शेतकरी अडचणीत आहे. अशात रोज जनावरे मारली जात असल्याने शेतकऱ्यांचे जगणे कठीण झाले आहे. प्रशासनाने तातडीने या प्रकरणाकडे लक्ष देऊन आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशी त्यांनी मागणी केली.

वन्यप्राण्यांच्या हालचाली वाढल्याने गावकऱ्यांना खालील सूचना देण्यात आल्या आहेत, गावस्तरावर रात्री संयुक्त पहारा व्यवस्था ठेवावी.

# गेवराईत ग्रामसेवकाला लोखंडी रॉडने मारहाण

**गेवराई | दिव्य रिपोर्टर**

बीडमधील मारहाणीच्या घटना काही कमी होताना दिसत नाहीत. गेवराई तालुक्यात अशीच एक घटना घडली असून नांदगाव ग्रामसेवकाला रक्तबंबाळ होईपर्यंत मारहाण करण्यात आली. जालिंदर सुरवसे असं ग्रामसेवकाचं नाव असून त्याला गावगुंडांनी मारहाण केली. या प्रकरणी तलवाडा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला.



ग्रामसेवकाला करण्यात आलेली मारहाण ही जबर होती. त्यामध्ये ग्रामसेवकाच्या अंगावर मारहाणीचे वळ उठले आहे, त्याचे शरीर काळे-निळे पडल्याचं दिसून आलं. तसेच त्याला रक्तबंबाळ होईपर्यंत ही मारहाण करण्यात आली. लाथा बुक्यांसह लोखंडी रॉड आणि काठ्यांनी सुरवसे यांना ही मारहाण झाली आहे. ग्रामसेवकाला गावगुंडांनी का मारहाण केली याची माहिती मात्र समोर आली नाही.याप्रकरणी सध्या तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. जालिंदर सुरवसे यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असून सुरवसे यांची आई आणि बहीण यांच्या माध्यमातून तक्रार देण्यात आली आहे.

# माता व बाल संगोपन रुग्णालयाला फर्निचर, सिलिंग व ऑक्सिजन पाईपलाईन आदी कामांसाठी पावणेदोन कोटींचा निधी मंजूर

**पालकमंत्री अजितदादा पवार यांचे आभार**

**बीड | दिव्य रिपोर्टर**

बीड जिल्हा रुग्णालय परिसरात २०१६-१७ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत मंजूर झालेले १०० खाटांचे माता व बाल संगोपन रुग्णालय तब्बल २१ कोटी खर्चून २०२३ मध्ये पूर्ण झाले. मात्र गेली दोन वर्षे निधीअभावी लिफ्ट ,फर्निचर, सिलिंग आणि ऑक्सिजन पाईपलाईनची कामे रखडली असल्याने ही इमारत धुळखात पडून होती.



सदर प्रकरणात सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख व बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे महाराष्ट्र राज्य प्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी २ वर्षांपासून सतत निवेदने, आंदोलनाद्वारे हा विषय सातत्याने पुढे आणला होता. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय राऊत यांना निवेदन देत, "निधी तातडीने उपलब्ध न झाल्यास 'पालकमंत्री अजितदादा के नाम पे देदे बाबा' लक्ष्यवेधी भिक मागो आंदोलन केले जाईल," असा इशारा देण्यात आला होता.

या पाठपुराव्यानंतर अखेर जिल्हा नियोजन समितीकडून खालीलप्रमाणे निधी मंजूर करण्यात आला

फर्निचर : ९८ लाख ५ हजार,
सिलिंग काम : ४९ लाख ५ हजार, ऑक्सिजन प्लांट ते इमारत,
पाईपलाईन : २५ लाख
एकूण १ कोटी ७३ लाख (पावणे २ कोटी रुपये)

पालकमंत्री अजितदादा पवार यांचे आभार डॉ. ढवळे

बीड जिल्हा रुग्णालयाची सध्याची क्षमता ३२० खाटांची आहे, तर प्रत्यक्षात रुग्णसंख्या ४५० च्या घरात असते. प्रसूती व प्रसूती-पश्चात विभागात क्षमतेपेक्षा जास्त रुग्ण असल्याने गर्भवती महिलांना अनेकदा खाट उपलब्ध होत नाही. या परिस्थितीत १०० खाटांच्या स्वतंत्र माता-बाल रुग्णालयामुळे महिलांना आणि बालकांना स्वतंत्र, सुरक्षित व सुसज्ज उपचारसुविधा मिळणार आहेत.

फर्निचर व सिलिंग कामांसाठी पावणे दोन कोटींचा निधी मंजूर केल्याबद्दल राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांचे मन:पूर्वक आभार असल्याचे डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी म्हटले आहे.



## भागुजीराव ढेकळे विद्यालयात माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध स्पर्धा

**गेवराई | दिव्य रिपोर्टर**

तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव तथा माजी मंत्री जयदत्तअण्णा क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध स्पर्धा घेण्यात आल्या. कृषि पंडित भागुजीराव ढेकळ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पाडळसिंगी येथे माजी मंत्री जयदत्तअण्णा क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त दि.२ ते ६ डिसेंबर या कालावधीत प्रश्नमंजुषा स्पर्धा, निबंध स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, हस्ताक्षर स्पधार्र् प्राचार्य थिटे ए. एस. यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आल्या. त्यांना पर्यवेक्षक रांजवण आर. डी., सर्व शिक्षकांचे सहकार्य लाभले.

# शेतकऱ्यांच्या कापसाला दहा हजार भाव द्या-राजेंद्र आमटे

## सीसीआयकडून होणारी पिळवणूक तत्काळ थांबवा

**बीड | दिव्य रिपोर्टर**

संत तुकाराम बाबा महाराज यांच्या पुण्यभूमी पारगाव जप्ती येथून कापूस आंदोलन जागृती बैठकीस सुरवात झाली शेतकऱ्याच्या कापसाला किमान १० हजार रुपये भाव देण्यात यावा, शेतकऱ्यांची कापूस खरेदी केंद्रावर सी सी आय कडून होणारी पिळोणूक तत्काळ थांबवण्यात यावी या मागणी बीड येथे खूप मोठे शेतकरी आंदोलन करण्यात येणार आहे या आंदोलनाची पहिली बैठक संत तुकाराम बाबा महाराज यांच्या पुण्यभूमी पारगाव जप्ती येथील सुरू करण्यात आली.

शेतकऱ्यांना वाली राहिला नाही एकीकडे निसर्ग कहर मांडत आहे तर दुसरीकडे शेतकऱ्याच्या पिकाला भाव मिळत नाही शेतकऱ्याने कारण तरी काय किमान शेतकऱ्यांच्या कापसाला १० हजार रुपये हमीभाव व सोयाबीन ला ६ हजार हमी भाव देण्यात यावा शेतकऱ्यांची सी सी आय कडून खूप पिळोणूक होत आहे. शेतकरी अडाणी आहे त्याच्या अडाणी पणामुळे ऑनलिन बुकिंग अवघड झाले सी सी आय कडून शेतकऱ्याची मोठी पिळोणूक होते आहे ती तत्काळ ठरवावी या कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची संत तुकाराम बाबा महाराज यांच्या पुण्यभूमी पारगाव जप्ती येथून सुरूवात करण्यात आली या वेळी शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, नवनाथ तीपाले, गणेश तीपाले, शहदेव तीपाले अरुण तीपाले महेंद्र तीपाले, मिटू तीपाले वैजनाथ तीपाले नामदेव तीपाले राजेंद्र तीपाले महेंद्र तीपाले रवी तीपाले, बबन धुरंदरे, अरुण कदम आदी शेतकरी उपस्थित होते



# जयदत्त क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त जिव्हाळा बेघर केंद्रामध्ये गरजू निराधार लोकांना अन्नदान व फळे वाटप



**बीड | दिव्य रिपोर्टर**

माजी मंत्री लोकनेते मा. जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त बीड येथील जिव्हाळा बेघर केंद्रामध्ये गरजू निराधार लोकांना अन्नदान व फळे वाटप करण्यात आले या निमित्ताने कॅनडा देशातील रहिवासी प्रेरित काझी (आर्किटेक्ट )हे उपस्थित होते, तसेच प्रमुख अतिथी म्हणून त्यांच्या समवेत मुंबई येथील भीम आर्मीचे महाराष्ट्राचे कार्याध्यक्ष मा. सुनील गायकवाड साहेब तसेच सामाजिक कार्यकर्ते ॲड.राहुल मस्के, शशांक सोनवणे (पुणे)विजय गायकवाड, आदींच्या उपस्थितीमध्ये या गरजू, बेघर, निराधार लोकांना अन्नदान व फळे वाटप करण्यात आले यावेळी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले याप्रसंगी बोलताना प्रेरित काझी म्हणाले की आपले हे काम अत्यंत मोलाचे आहे आपल्या कामास आम्ही केव्हाही मदत करण्यास तयार आहेत निराधार लोकांचा आधार बनने ही फार मोठी गोष्ट आहे. यावेळी भीम आर्मीचे महाराष्ट्राचे कार्याध्यक्ष मात.सुनील गायकवाड म्हणाले की आपण या लोकांना आधार दिला आणि केव्हाही आपल्या या निराधार केंद्रास मदत करू. निराधार लोकांना आधार देण्याचे काम राजू वंजारे यांच्या माध्यमातून होत आहे हे आम्हाला अभिमानास्पद गोष्ट आहे सामाजिक काम करत असताना निस्वार्थीपणे आपण हे काम करत आहात याची समाजाणे जाणीव ठेवली पाहिजे आणि आपणास वेळोवेळी मदत केली पाहिजे अशी भावना व्यक्त केली याप्रसंगी ॲड.राहुल मस्के यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या सामाजिक कार्यकर्ते अशोकराव शेजवळ यांच्या माध्यमातून हा मा.जयदत्त अण्णा यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

# उपविभागीय अभियंता बोराडे यांच्या कार्यकाळात कामांचा ‘रेकॉर्डब्रेक’






## बोराडे यांनी चार वर्षात केलेल्या कामांचा लेखाजोखा, ऐतिहासिक कामगिरी

**बीड । दिव्य रिपोर्टर**

६ डिसेंबर २०२१ या साली उपविभागीय अभियंता या पदाचा चंद्रकांत पंढरीनाथ बोराडे यांनी पदभार घेतला. त्यांनी पदभार घेतल्यानंतर ही मोठी जबाबदारी ते पेलतील का? असा सर्वांनाच प्रश्न पडला होता. बघता बघता ६ डिसेंबर २०२५ या रोजी बोराडे यांनी पद्भार घेतलेले चार वर्षे पूर्ण झाले. त्यांनी मागील चार वर्षाच्या कार्यकाळात केलेल्या कामाचा लेखाजोखा या लेखमधून प्रसिद्ध करत आहोत. खऱ्या अर्थाने पाहिले तर मागील चार वर्षात बोराडे यांच्या कार्यकाळात जी कामे झालेली आहेत ती कामे सार्वजनिक बांधकाम विभागातून मागील चाळीस वर्षांत झाली नाही ती कामे बोराडे यांनी त्यांच्या कार्यकाळात चार वर्षांत करून दाखविली. विशेष म्हणजे उपविभागीय अभियंता बोराडे यांच्या कार्यकाळात कामांचा रेकॉर्डब्रेक झाला म्हणणे वावगे ठरणार नाही. एकंदरीत बोराडे यांची ही ऐतिहासिक कामगिरीच म्हणावी लागेल. विशेष म्हणजे बोराडे हे सेवानिवृत्त होणार होते परंतु त्यांना एक वर्षाची मुदतवाढ मिळाली असून या एक वर्षात पुन्हा विकासकामात भर पडणार असल्याची चर्चा जोरात सुरू आहे.


**जिल्हाधिकारी कार्यालयाची इमारत, सार्वजनिक बांधकाम विभागाची इमारत, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दोनशे खाटांचे जिल्हा रुग्णालयाची सात मजला इमारत, कृषि भवन, भगवानबाबा मुलांचे वस्तीगृह, महसूल भवन, तहसील व एसडीएम कार्यालय, जिल्हा फॉरेस्ट ऑफीस इमारत, लायब्ररी, महसूल निवासस्थान ही उल्लेखनिय कामे बोराडे यांच्या कार्यकाळातच**

केज तालुक्यातील गोटेगाव येथील चंद्रकांत पंढरीनाथ बोराडे हे शेतकरी कुटुंबातील व्यक्ती असून त्यांचे घराणे पाटील म्हणून ओळखले जाते. सुरुवातीला त्यांनी बीड-गेवराई-वडवणी याठिकाणी शाखाअभियंता म्हणून उत्तम कामगिरी केली. त्या चांगल्या कामाची पावती म्हणून त्यांच्याकडे उपविभागीय अभियंता बीडचा पद्भार देण्यात आला. ६ डिसेंबर २०२१ या वर्षी त्यांनी उपविभागीय अभियंता म्हणून पद्भार स्विकारला. ही मोठी जबाबदारी असल्याने त्यांच्यासमोर मोठे आवाहन होते परंतु कोणत्याही राजकीय दबावात न येता सर्वसामान्यांना सोबत घेवून तसेच कार्यालयातील आपल्या सहकारी कर्मचाऱ्यांचा विश्वास जिंकून तब्बल चार वर्षे बोराडे यांनी उपविभागीय अभियंता म्हणून योग्य कामगिरी करून दाखविली. त्यांच्या कार्यकाळात जिल्हाधिकारी कार्यालयाची इमारत, सार्वजनिक बांधकाम विभागाची इमारत, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दोनशे खाटांचे जिल्हा रुग्णालयाची सात मजला इमारत, कृषि भवन, भगवानबाबा मुलांचे वस्तीगृह, महसूल भवन, तहसील व एसडीएम कार्यालय, जिल्हा फॉरेस्ट ऑफीस इमारत, लायब्ररी, महसूल निवासस्थान ही उल्लेखनिय कामे झाली. एकंदरीत बोराडे यांनी बीड शहरात अशाप्रकारे मोठमोठी कामे करून इतिहास घडविला म्हणणे वावगे ठरणार नाही. ही कामे करताना त्यांना सिताई कन्स्ट्रक्शनचे रंजित क्षीरसागर, विनायक कन्स्ट्रक्शनचे मनोज गिते, राजकमल कन्स्ट्रक्शनचे लाटे, कॉन्ट्रॅक्टर उडाण या गुत्तेदाराचे मोलाचे सहकार्य लाभले. नियमाने या गुत्तेदारांनी टेंडर भरून कामे घेतली असली तरी त्या कामावर उपविभागीय अभियंता बोराडे यांनी विशेष लक्ष देवून दर्जेदार कामे करून घेतली. ही कामे करताना सार्वजनिक बांधकाम विभागातील त्यांचे सहकारी शाखा अभियंता,सहाय्यक अभियंता यांचे मोलाचे योगदान त्यांना लाभले. एकंदरीत हे टिमवर्क असते आणि या टिमने करून दाखविले म्हणावे लागेल. तसेच बोराडे हे नेहमी वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मन जिंकून कामे करतात म्हणून जिल्ह्यातील इतर विभागातील अधिकारीही त्यांना विशेष सहकार्य करून त्यांच्यावर विश्वास करतात. एकंदरीत बीड तालुक्यात बोराडे यांनी त्यांच्या कार्यकाळात विकासाची गंगा वाहिली म्हणणे योग्य राहणार. त्याशिवाय त्यांचा मुलगा ओम बोराडे यांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी जिम व्यवसाय करण्याचे त्यांचे ध्येय होते. नावाला हा व्यवसाय आहे. यातून नवीन पिढी निर्व्यसनी करण्याचा निर्धार ओम यांनी घेतला असून नव्या पिढीसाठी ओमची ही भूमिका मोलाची राहणार यात काही शंका नाही.

**सिताई कन्स्ट्रक्शनचे रंजित क्षीरसागर, विनायक कन्स्ट्रक्शनचे मनोज गिते, राजकमल कन्स्ट्रक्शनचे लाटे, कॉन्ट्रॅक्टर उडाण या गुत्तेदाराचे मोलाचे सहकार्य लाभले, सहाय्यक अभियंता, कनिष्ठ अभियंता व सार्वजनिक विभागातील टिम यांच्यामुळेच विकासकामे शक्य**


## मोठ्या प्रमाणात कामांना मंजूरी आणि कामे दर्जेदार

बीड शहरातील शासकीय कार्यालय, अधिकाऱ्यांची निवासस्थाने ही कामे दर्जेदार करून घेतली असून यातील काही कामे प्रगतीपथावर आहेत. याशिवाय बीड तालुक्यातील बीड-पिंपळनेर रस्त्याचे काम तसेच नवगण राजूरीची शाळा ते चिंचपूर रोड, पांगरी रोड ही कामे आजही दर्जेदार झालेली आहेत. तसेच कॉमन पुलही दर्जेदार केलेली आहेत. बीड तालुक्यात मोठ्या प्रमाणात कामांना मंजूरी आणणे आणि काम दर्जेदार करून घेणे याकडे बोराडे यांनी विशेष लक्ष दिल्याने वरील कामे दर्जेदार झालेली आहेत. तसेच जर बोराडे यांना एक वर्षाची मुदतवाढ मिळाली तर बीड तालुक्यात अनेक कामे करण्याचा त्यांचे ध्येय असून प्रशासनाने अशा कर्तबगार अधिकाऱ्याची दखल घेणे गरजेचे आहे.




## बोराडे यांचे चिरंजीव ओम बोराडे यांच्या ड्रिम जिम व्यवसायातून नवीन पिढी घडविण्याचे ध्येय, ओम यांचेही मोठे योगदान

शिक्षण सुरू असतानाच उपविभागीय अभियंता चंद्रकांत बोराडे यांचे चिरंजीव ओम बोराडे यांनी शिक्षणानंतर काही तरी सामाजिक व्यवसाय करून त्या व्यवसायातून समाज घडविण्याचे कार्य आपल्या हाताने व्हावे या दृष्टीकोनातून त्यांनी विचार केला होता. शिक्षण संपल्यानंतर त्यांनी बीड बसस्थानकाच्या पाठीमागील बाजूस ड्रिम जिम या नावाने जिम व्यवसाय सुरू केला. यात अनेक तरुण मुले जिमसाठी येत आहेत. नावाला हा व्यवसाय आहे, खऱ्या अर्थाने ओमने समाज घडविण्याचे स्वप्न या जिममधून पूर्ण केले असून भविष्यात समाजातील तरुण निर्व्यसनी व्हावे, त्यांना जिममधून शारीरिक अभ्यासासह एक चांगले आरोग्य विषयी प्रशिक्षणही मिळत असल्याने भविष्यात येणारी पिढी निर्व्यसनी आणि तंदुरूस्त बनावी हे ध्येय असून जिमच्या माध्यमातून ओमचेही मोठे योगदान दिसून येते. विशेष म्हणजे उपविभागीय अभियंता बोराडे ओमला जिमसारखा व्यवसाय करण्यासाठी प्रोत्साहीत करताना दिसून आले.



या ड्रिम जिममधून पिढी घडविण्याचे काम ओमच्या हाताने व्हावे ही माझी अपेक्षा असून आज समाजातील तरुण ओमच्या जिममध्ये येवून प्रशिक्षण घेतात याचा मला मोठा अभिमान वाटतो. भविष्यात येणारी पिढी या जिममधून चांगली घडविण्यासाठी ओमचीही धडपड आहे आणि यासाठी आम्ही ओमच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहू अशी भावनिक प्रतिक्रिया उपविभागीय अभियंता चंद्रकांत बोराडे यांनी दिव्य आधारशी बोलताना व्यक्त केली. मी केज तालुक्यातील रहिवाशी असून बीड आमची मातृभूमी आहे. उपअभियंता पदावर असल्याने बीडमध्ये विकासकामे करताना मोठा आनंद मिळतो. तसाच बीडमधील समाजातील तरुणांच्या तंदुरुस्तीसाठी उघडलेली ही जिम पाहून मला याचाही मोठा अभिमान वाटतो. भविष्यात या जिममधून घडलेली पिढी आपले नावलौकीक करेल यात काही शंका नाही.

# सर्वे नंबर 35 तरफ गिरामचे लेआऊट संशयाच्या विळख्यात




सोमवार, दि. ०८ डिसेंबर २०२५ (पान-४)

**तत्कालीन मुख्याधिकारी यांनी तात्पुरते लेआऊट ज्यावेळी करून दिले त्यावेळी सर्वे नंबर ३५ तरफ गिराम ही जागा आरक्षित असल्याची माहिती मिळाली आहे तर मग तात्पुरते लेआऊट दिले कसे?**

**आ.संदीप क्षीरसागर यांनी सर्वे नं.३५ तरफ गिराममध्ये नियमबाह्य कामासंदर्भात मागील अधिवेशनात आवाज उठविला होता, आता पुन्हा आ.क्षीरसागर हिवाळी अधिवेशनात हा मुद्दा घेणार का?**

**जमिनीची मोजणी झाली नसल्याने अद्यापपर्यंत त्या जागेचे फेरफार झाले नाही, प्रशासकीय चुक ग्राहकांच्या अंगलट येण्याची शक्यता**

## भूमिअभिलेख कार्यालयातून जमिनीची मोजणी झाली नाही तर मग लेआऊट झाले कसे?




**लाखो रुपयांचा आर्थिक व्यवहार करून संबंधित अधिकाऱ्यांनी लेआऊट करून दिल्याची शंका, समाजसेवक मुकरमजान पठाण यांच्या तक्रारीतून होणार मोठी पोलखोल**

**नगरपरिषद हद्दीतील सर्वे नंबर ३५ तरफ गिराम येथील जागेचे तात्पुरते लेआऊट तत्कालीन मुख्याधिकारी यांनी ३१ मे २०२२ रोजी करून दिले होते परंतु तत्कालीन मुख्याधिकारी यांना २७ मे २०२२ रोजी कार्यमुक्त करण्यात आले होते, त्यांना अधिकार नसताना तसेच पद्‌भार सोडलेला असताना ३१ मे रोजी लेआऊट करून दिले कसे? सर्व प्रकार संशयास्पद**

**बीड :**

तत्कालीन मुख्याधिकारी यांच्या बनावट स्वाक्षरीचे गुंठेवारी प्रमाणपत्र देणारे रॅकेट सक्रीय झाल्यानंतर अनेक ग्राहकांना बनावट स्वाक्षरीचे गुंठेवारी प्रमाणपत्र देण्यात आले. बनावट स्वाक्षरीच्या गुंठेवारी प्रमाणपत्राच्या आधारावर अनेक जमिनीची खरेदीविक्री झाली. सदरील बाब मुख्याधिकारी यांच्या निदर्शणास आल्यानंतर त्यांनी बनावट स्वाक्षरीच्या गुंठेवारी प्रमाणपत्रासंदर्भात दुय्यम निबंधक कार्यालयाला पत्र लिहून बनावट स्वाक्षरीचे गुंठेवारी प्रमाणपत्र मोठ्या प्रमाणात देणारे रॅकेट सक्रीय असल्याची बाब निदर्शणास आणून दिली आणि यापुढे गुंठेवारी प्रमाणपत्राची नगरपालिकेतून शहानिशा करूनच खरेदीखत करावे असे पत्रव्यवहार केले. त्याशिवाय बीड शहरातील आरक्षण असलेल्या जमिनीचीही खरेदी-विक्री होत असल्याची बाब निदर्शणास आल्यानंतर बीड नगरपालिकेने काही आरक्षित जमिनीची सर्वे नंबरची यादी रजिस्ट्री कार्यालयात देवून सदरील सर्वे नंबरचे खरेदी-खत करू नये असे सांगितले. त्याशिवाय मागील अधिवेशन आ.संदीप क्षीरसागर यांनी मोठ्या प्रमाणात नियमबाह्य रजिस्ट्री झालेल्या जमिनीसंदर्भात आवाज उठविला. त्यानंतर नियमबाह्य कामाला लगाम लागले होते. वरील प्रकरण ताजे असतानाच बीड नगरपालिकेतून सर्वे नंबर ३५ तरफ गिराम या जमिनीचे अंतिम लेआऊट करण्यात आले. विशेष म्हणजे त्या जमिनीचे मोजमाप झालेले नसताना नगरप्रशासनाने लेआऊट कसे केले? हा मुद्दा उपस्थित झाला. तसेच भूमिअभिलेखमधून जमिनीची मोजणी झाली नसल्याने त्यांनी या जमिनीचे फेरफारही केले नाही. प्रशासनाच्या चुका ग्राहकांच्या अंगलट येण्याची शक्यता असून सर्वे नंबर ३५ तरफ गिराम याठिकाणी जागा घेण्यासाठी ग्राहकांना कोट्यवधी रुपये मोजावे लागतात. कोट्यवधी रुपये खर्चूनही ग्राहकांना घेतलेल्या जमिनीसंदर्भात वाद होत असतील तर ग्राहकांना याचा त्रास होणारच. एकंदरीत नगरप्रशासनाने सर्वे नंबर ३५ तरफ गिराम या जमिनीचे लेआऊट कसे करून दिले? यासंदर्भात येथील ज्येष्ठ समाजसेवक मुकरमजान पठाण यांनी तक्रार करून नियमबाह्य कामे करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली होती. त्याअनुषंगाने सदरील प्रकरण न्यायालयप्रविष्ठ असताना न्यायालयाने याप्रकरणात जैसे थे अशी अट ठेवलेली असतानाही तत्कालीन मुख्याधिकारी यांनी त्या जमिनीचे तात्पुरते लेआऊट सन २०२२ यावर्षी केल्याने कोर्टाचा अवमान झाला होता. त्याशिवाय नियमबाह्य काम करून संबंधित त्या काळातील मुख्याधिकारी, नगररचनाकार, सहाय्यक नगररचनाकार यांनी शासनाची दिशाभुल केली, याप्रकरणी अवर सचिव यांनी जिल्हा नगर प्रशासन यांना पत्रव्यवहार करून गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले होते. परंतु या सर्व बाबीकडे का दुर्लक्ष करण्यात आले? हा चौकशीचा भाग असून जिल्हाधिकारी व जिल्हा नगरप्रशासन अधिकारी यांनी सर्वे नंबर ३५ तरफ गिराम ही फाईल पुन्हा ओपन करून याची पडताळणी करावी अशी सर्वसामान्यातून मागणी होत असून अंतिम लेआऊट करून देण्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार झाल्याची शंका व्यक्त केली जात आहे.

सर्वे नं.३५ तरफ गिराम ही जागा सुरुवातीपासूनच वादाच्या भोवऱ्यात अडकलेली दिसून येते. तत्कालीन मुख्याधिकारी यांनी सदरील जागेचे तात्पुरते लेआऊट ३१ मे २०२२ साली करून दिले होते. विशेष म्हणजे संबंधित मुख्याधिकारी हे २७ मे २०२२ रोजी कार्यमुक्त झाले होते. तर मग त्यांनी ३१ मे रोजी लेआऊट कसे करून दिले? एकंदरीत सदरील लेआऊट नियमबाह्य झाल्याचे यातून स्पष्ट दिसून येते. विशेष म्हणजे २०२२ साली सदरील सर्वे नंबरच्या जागेवर आरक्षण होते. आरक्षण असतानाही तत्कालीन मुख्याधिकारी यांनी तात्पुरते लेआऊट करून दिल्याची चर्चा असून याबाबत चौकशी सुरू होती. त्यानंतरचे मुख्याधिकारी यांनी एप्रिल २०२५ रोजी या सर्वे नंबरच्या जागेला अंतिम लेआऊट करून मंजूरी दिली. पूर्वी तात्पुरते लेआऊट हे नियमबाह्य असताना ते प्रकरण चौकशीत असताना एप्रिल २०२५ मध्ये सदरील जमिनीचे अंतिम लेआऊट करून देणे कितपत योग्य आहे. एकंदरीत मोठा आर्थिक व्यवहार करून या जमिनीचे लेआऊट करून दिल्याची शंका व्यक्त केली जात असून जर या जमिनीची संचिका पुन्हा तपासणी केली तर मोठी खळबळ होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. याबाबत येथील ज्येष्ठ समाजसेवक मुकरमजान पठाण यांनी तक्रार दिल्यानंतर या प्रकरणाची चौकशी सुरू असून यात बोगसगिरी करणारे काही कर्मचारी सेवानिवृत्त झाल्याने आता आमचे काहीच होणार नाही अशी भूमिका घेवून प्रशासनाची थट्टा करत असल्याचे दिसून आले आहे. तसेच या गंभीर प्रकरणाची दखल अवर सचिव यांनी घेतली होती. २०२२ या साली तात्पुरते लेआऊट करून देणारे तत्कालीन मुख्याधिकारी, नगररचनाकार व सहाय्यक नगररचनाकार यांच्यावर गुन्हे दाखल करण्याचे आदेशित केले होते.परंतु अद्यापपर्यंत या अधिकाऱ्यांवर कोणतीच कारवाई झाली नाही. आता या प्रकरणाला दिव्य आधारने पुन्हा वाचा फोडली असून दिव्य आधार या प्रकरणाचा सखोल पाठपुरावा करणार आहे यात काही शंका नाही.

### तो सहाय्यक नगररचनाकार लाचलुचपतच्या जाळ्यातही अडकलेला

सर्वे नंबर ३५ तरफ गिराम या जागेचे अंतिम लेआऊट करून देण्यासाठी त्या लेआऊटवर संबंधित सहाय्यक नगररचनाकार यांची स्वाक्षरी बंधनकारक आहे. परंतु जमिनीची मोजणी न करता सदरील लेआऊट करून देणे हे नियमबाह्य आहे. म्हणून त्यावेळचे सहाय्यक नगररचनाकार यांनी त्या लेआऊटवर स्वाक्षरी करण्यास मनाई केली. त्यावेळी मुख्याधिकारी यांनी संबंधित सहाय्यक नगररचनाकार यांचा पदभार काढून सदरील पदभार एका भ्रष्ट कर्मचाऱ्याकडे दिला. त्या कर्मचाऱ्याने नियमबाह्य लेआऊटवर स्वाक्षरी करून मोठा आर्थिक व्यवहार केल्याची शंका असून चौकशीअंती सर्वकाही समोर येणारच आहे. दुसरे असे की, ज्या सहाय्यक नगररचनाकाराकडे नियमबाह्य पदभार देण्यात आला होता तो सहाय्यक नगररचनाकार यापूर्वी ३० हजार रुपयांची लाच मागणी प्रकरणी लाचलुचपत विभागाच्या जाळ्यातही अडकल्याची माहिती मिळाली असून अशा भ्रष्ट अधिकाऱ्याकडे एवढ्यामोठ्या जबाबदारीचा पदभार देणे कितपत योग्य आहे. तसेच त्या भ्रष्ट अधिकाऱ्याच्या कार्यकाळात झालेल्या सर्व कामाचा जिल्हाधिकारी यांनी आढावा घेण्याची गरज आहे.

### आ.संदीप क्षीरसागर पुन्हा अधिवेशनात हा मुद्दा गाजवतील का?



सर्वे नंबर ३५ तरफ गिरामसहीत आ.संदीप क्षीरसागर यांनी मागील अधिवेशनात अनेक आरक्षित जमिनीचे मुद्दे उपस्थित करून अधिवेशनात आवाज उठविला होता. त्यानंतर या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी झाली. आता सर्वे नंबर ३५ याचे केलेले लेआऊट संशयास्पद असून आ.संदीप क्षीरसागर पुन्हा हा मुद्दा हिवाळी अधिवेशनात गाजवतील का? असा सर्वसामान्यांना प्रश्न पडला असून भूमिअभिलेख कार्यालयातून कोणतीही मोजणी न करता जमिनीचे अंतिम लेआऊट करून देणे कितपत योग्य आहे यासाठी आ.क्षीरसागरांनी विशेष पाठपुरावा करून अशाप्रकारे बोगसगिरी करणाऱ्या अधिकाऱ्यांना चपराक देण्याची गरज आहे.

**तत्कालीन मुख्याधिकारी यांनी तात्पुरते केलेले लेआऊट नियमबाह्य असताना त्या तात्पुरत्या लेआऊटच्या आधारे त्यानंतर मुख्याधिकारी यांनी एप्रिल २०२५ रोजी त्या लेआऊटला अंतिम मान्यता दिली, मोठा आर्थिक व्यवहार करून अंतिम लेआऊटला मान्यता दिल्याचा संशय असून यात नगरपालिकेतील काही कर्मचारीही सामील असल्याची शंका व्यक्त केली जात आहे**

**त्या नियमबाह्य लेआऊटवर स्वाक्षरी करण्यास नकार दिलेल्या कर्मचाऱ्याचा पद्‌भार काढून तो पद्‌भार एका भ्रष्ट कर्मचाऱ्याला देवून त्या भ्रष्ट कर्मचाऱ्याची स्वाक्षरी लेआऊटवर घेवून त्या लेआऊटला अंतिम मान्यता दिली असल्याची चर्चा असून विशेष म्हणजे तो भ्रष्ट कर्मचारी लाचलुचपत विभागातही अडकलेला असल्याची माहिती समोर आली आहे**

**सर्वे नं.३५ तरफ गिराम प्रकरणात शासनाची दिशाभुल करत न्यायालयाचा अवमान केल्याप्रकरणी तत्कालीन मुख्याधिकारी, नगररचनाकार व सहाय्यक नगररचनाकार यांच्यावर गुन्हे दाखल करण्याचे पत्र राज्यशासनाचे अवर सचिव यांनी जिल्हा प्रशासन अधिकारी नगर परिषद यांना आदेशित केले होते त्या आदेशाचे काय झाले? याचीही चौकशी करणे गरजेचे**

### लेआऊट झाले तरी फेरफार झाले नाही

कोणत्याही जमिनीचे लेआऊट करून देण्यापूर्वी त्या जमिनीची मोजणी करून घेणे बंधनकारक आहे. नगरप्रशासनाने भूमिअभिलेख कार्यालयाला पत्रव्यवहार करून जमीन मोजणीसाठी सांगणे त्यानंतर भूमिअभिलेख कार्यालयाने त्या जमिनीची मोजणी करून नकाशा तयार करून देणे अशाप्रकारे नियमात कामे होतात परंतु सर्वे नंबर ३५ तरफ गिराम या जमिनीची भूमिअभिलेख कार्यालयातून कोणतीच मोजणी झाली नाही.जमिनीची मोजणी झालेली नसतानाही त्या जमिनीचा लेआऊट करून देणे म्हणजे हे नियमबाह्य काम असावे. लेआऊट झालेले असतानाही आतापर्यंत फेरफार का झाले नाही याची प्रशासनाने चौकशी केली तर सर्व नियमबाह्य कामाची पोलखोल होईल यात काही शंका नाही. तसेच याचा ग्राहकांनाही फटका बसू शकतो.

## मतमोजणीच्या दिवशी गेवराईत गोंधळ घातला तर तडीपार करू -पोलीस अधीक्षक नवनीत काँवत

**बीड । दिव्य रिपोर्टर**

गेवराई नगरपालिका निवडणुकीच्या वेळी वाद झाल्याने आतापर्यंत सतरा आरोपींना अटक करून नोटीस वर सोडण्यात आले आहे या प्रकरणाची कसून चौकशी करण्यात येत असून प्रत्येकाकडून चांगल्या वर्तनाचे बंध पत्र घेण्यात आले आहे. मतमोजणीच्या दिवशी कायदा सुव्यवस्था हाती घेऊन सार्वजनिक अशांतता निर्माण करणाऱ्यां विरुद्ध कायदेशीर कडक कारवाई करून त्यांना गेवराई शहरातून तडीपार करण्यात येईल असा सज्जड दम पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी दिला आहे.

गेवराई नगरपालिका निवडणुकीमध्ये मतदान प्रक्रिया चालू असताना दोन गटात किरकोळ वाद होऊन एकमेकांना मारहाण केली. याची प्रतिक्रिया म्हणून कृष्णाई बंगल्याच्या वॉल कंपाऊंड मध्ये जाऊन तेथे हजर असलेल्या व्यक्तींना मारहाण करण्यात आली. त्याचे प्रत्युत्तर म्हणून



दुसऱ्या गटाने कोल्हेर रोडवरील बंगल्यासमोर जाऊन दगडफेक करून चार चाकी वाहनाच्या काचा फोडल्या. याप्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात २१ आरोपीसह इतर वीस ते तीस जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील १७ आरोपींना आज पर्यंत अटक करून त्यांना नोटीस वर सोडण्यात आले आहे. घटनास्थळाच्या ठिकाणी उपलब्ध सीसीटीव्ही फुटेज व समाज माध्यमातून झालेले व्हिडिओ चित्रणा ची पाहणी करण्यात आली असून एकूण २० आरोपींची नावे निष्पन्न झाली आहेत. त्यांचा शोध घेऊन त्यांना अटक करून त्यांच्यावर कायदेशीर कडक कारवाई करण्यात येणार आहे. सदर गुन्ह्यातील अटक करण्यात आलेल्या आरोपींकडे कसून चौकशी करण्यात आली असून अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या समक्ष हजर राहून त्यांच्याकडून चांगल्या वर्तनाचे व मोठ्या रकमेचे बंध पत्र घेण्यात येणार आहे. सदर आरोपींनी भविष्यात असे बेकायदेशीर वर्तन केल्यास त्यांना मोठ्या रकमेचा दंड करण्यात येईल किंवा जेलची हवाई खावी लागेल. मतमोजणीच्या वेळी कोणी कायदा व सुव्यवस्था हाती घेण्याचा प्रयत्न केला आणि अशांतता निर्माण केली तर अशा इसमांविरुद्ध गेवराई शहरातून तडीपार करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी दिले आहेत. गेवराई पोलिसांनी या संदर्भात आवाहन करून कोणीही एकमेकांच्या विरुद्ध राजकीय, सामाजिक ,धार्मिक किंवा दोन समाजात जातीय तेढ निर्माण होईल अशा प्रकारच्या पोस्ट प्रसारित करू नयेत किंवा तसे वक्तव्य ही करू नये. अशा सूचना देण्यात आल्या असून या समाज विघातक कृत्यावर पोलीस लक्ष ठेवून आहेत.अशा लोकांविरुध्द कायदेशीर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचेही पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी म्हटले आहे. यासंदर्भात गेवराई पोलीस ठाण्याच्या वतीने एक नोट जारी करण्यात आली आहे.

## महाडीबीटी अनुदान अडकलं कुठे?

### अनिल जगताप यांचा जिल्हाधिकाऱ्यांना सवाल

**बीड । दिव्य रिपोर्टर**

बीड मतदारसंघातील महाडीबीटी अंतर्गत लॉटरी पद्धतीने पूर्वसंमती मिळालेल्या शेतकऱ्यांना अनुदान तात्काळ वितरीत करण्यात यावे, अशी ठोस मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. लॉटरी प्रक्रियेत निवड झाल्यानंतर अनेक लाभार्थी शेतकऱ्यांनी आवश्यक ती खरेदी पूर्ण केली आहे. मा सहा-सहा र्मा उलटू नह अनुदानाची रक्कम खात्यात जमा होत



**महाडीबीटी अनुदान वितरणाला गती द्या; बीड जिल्हाधिकाऱ्यांना अनिलदादा जगताप यांचे निवेदन!**

नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. शासनाच्या योजनेत पात्र ठरूनही निधी न मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी असून तात्काळ निर्णयाची अपेक्षा आहे. पूर्वसंमती मिळालेल्या शेतकऱ्यांचे अनुदान तत्काळ मंजूर करून त्यांच्या खात्यात जमा करावे, जेणेकरून शेतकरी बांधवांवर अन्याय होणार नाही. असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक शेख रिजवान खलील यांनी माऊली ऑफसेट माळीवेस, बीड ता. जि. बीड ४३१ १२२ येथे छापून साप्ताहिक दिव्य आधार कार्यालय बशीरगंज, जयहिंद प्लाझा, नगरपालिकेजवळ, बीड ता. जि. बीड ४३१ १२२ येथे प्रकाशित केले आहे. मो. ९५६१८४०१८४ या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखास संपादक सहमत असतीलच असे नाही, वाद-विवाद बीड न्यायालय अंतर्गत.